राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-स्थास्वसं-2011/प्र.क्र. 25/का-5,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- 400 032.
दिनांक- 16 मार्च, 2012.

## प रि प त्र क

राज्यातील भिवंडी-निजामपूर, मालेगांव, लातूर, परभणी व चंद्रपूर या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून या निवडणुकीसाठीचे मतदान दिनांक- 15/4/2012 रोजी घेण्यात येणार आहे. या निवडणुकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत दिनांक- 14/4/2012 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती येत असल्याने त्यानिमित्त मिरवणुका काढता येतील किंवा कसे याबाबत आयोगाकडे विचारणा होत आहे. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत येणाऱ्या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत तसेच सामाजिक सलोखा राहावा यादृष्टीने एक विशेष बाब म्हणून राज्य निवडणूक आयोगाने दिनांक- 29/12/2011 रोजी निर्गमित केलेल्या आदर्श आचारसंहितेमधील परिच्छेद-3(17) मध्ये मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आली आहेत. या तत्वांचे पालन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणुका काढण्यास अथवा त्या संबंधाने काही सार्वजनिक कार्यक्रम घेण्यास हरकत नाही. मात्र यासाठी स्थानिक पातळीवर ज्या परवानग्या घ्याव्या लागतात त्या सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घेणे ही संबंधितांची जबाबदारी राहील. आयोगाने ठरवून दिलेली मार्गदर्शक तत्वे थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत :-

(1) राजकीय पक्षाचे नेते अथवा कार्यकर्ते अश्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होऊ शकतात.

(2) राजकीय व्यक्तीचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर असू शकते. परंतु तेथे ते कुठल्या पक्षाशी संबंधित आहेत किंवा कुठल्या प्रभागातील उमेदवार आहेत याचा उल्लेख असू नये.

(3) कार्यक्रम पत्रिकेवर राजकीय नेत्याचा फोटो छापण्यात येऊ नये.

(4) अश्या कार्यक्रमांमध्ये राजकीय नेत्यांचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये. तसेच राजकीय नेत्याने किंवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूचे वाटप करू नये अथवा त्यासाठी अश्या कार्यक्रमांचा आधार घेऊ नये.

(5) अश्या मिरवणुका अथवा समारंभात कुठल्याही पक्षाला राजकीय प्रचार करता येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी